अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## बनावट व्हिडीओ प्रसारित करणे भोवले

### रामदास तडस यांच्या तक्रारीवरून काँग्रेसच्या ॲडमीनवर गुन्हे दाखल

**वर्धा** : जुना व्हिडीओ प्रसारित केल्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या 'एक्स' खात्याच्या ॲडमीनवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाजपचे उमेदवार रामदास तडस यांनी याप्रकरणी तक्रार केली होती. आदर्श आचारसंहिता लागू असताना हा खोडसाळ प्रकार केल्याचा त्यांचा आक्षेप आहे.

काँग्रेसच्या एक्स खात्यावर रामदास तडस व भाजपसंदर्भात अतिशय खोडसाळ पण बनावटी व बदनामीकारक अर्धवट व्हिडीओ प्रसारित करण्यात आला आहे. हा व्हिडीओ जवळपास पाच वर्षांपूर्वी म्हणजे ३ एप्रिल २०१९ ला त्यावेळेच्या लोकसभा निवडणुकीत मतदारांची दिशाभूल करण्यासाठी प्रसारित करण्यात आला होता, असे तक्रारीत नमूद आहे. आता परत तो प्रसारित करण्यात आला, अशी तक्रार रामनगर पोलिसांकडे करण्यात आली. त्याची दखल घेवून पोलिसांनी आज भारतीय दंड संहितेअंतर्गत गुन्हे दाखल केले आहे.

पाच वर्ष जुना असलेला व्हिडीओ व आता भाजपने निवडणुकीदरम्यान केलेली घोषणा या दोन्ही गोष्टींचा वास्तविकतेशी काहीच संबंध नाही. जुनाच व्हिडीओ बनावट पद्धतीने सोशल मीडियावर प्रसिद्ध करण्याची बाब चुकीची व बेकायदेशीर आहे.



# 'ये तो ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी आहे'

**मुंबई/प्रतिनिधी**

भारतीय रिझर्व्ह बँकेचा ९० वा वर्धापन दिन आहे. यानिमित्त मुंबईत रिझर्व्ह बँकेच्या मुख्यालयात विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासह महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा विकसित भारताचा नारा दिला. तसेच मोदी म्हणाले विकसनशील भारताचा विकसित भारत होण्याच्या प्रवासात रिझर्व्ह बँकेची महत्त्वाची भूमिका असेल. रिझर्व्ह बँकेने गेल्या १० वर्षांमध्ये भारताची बँकिंग व्यवस्था आणि अर्थव्यवस्था रुळावर आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. परंतु, गेल्या १० वर्षांमध्ये आपण केलेली कामं केवळ एक ट्रेलर आहे. चित्रपट येणं अद्याप बाकी आहे.



पंतप्रधान मोदी म्हणाले, २०१४ मध्ये रिझर्व्ह बँकेच्या ८० व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात मी सहभागी झालो होतो. तेव्हाची परिस्थिती थोडी वेगळी होती. तेव्हा आपल्या बँकिंग क्षेत्रासमोर अनेक आणि मोठी आव्हानं होती. एनपीए आणि अस्थिर प्रणालीमुळे देशाची जनता भारताच्या बँकिंग क्षेत्राच्या भविष्याबाबत चिंतेत होती. कोलमडलेल्या बँकिंग क्षेत्रामुळे अर्थव्यवस्थेला कोणतंही सहाय्य मिळत नव्हतं. देश एकाच वेळी दोन-दोन आघाड्यांवर लढत होता. परंतु, गेल्या १० वर्षांमध्ये स्थिती सुधारली आहे. आरबीआय आणि सरकारने मिळून केलेल्या कामांमुळे देशाच्या बँकिंग क्षेत्राने भरारी घेण्यास सुरुवात केली आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचा नारा देताना काही घोषणादेखील केल्या. तसेच ते म्हणाले, पुढचे १०० दिवस मी थोडा निवडणुकीत व्यस्त असेन. तुम्ही सर्वजण (आरबीआय आणि बँकिंग क्षेत्रांशी संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि संस्था) या काळात तयारी करून ठेवा. भारताची आत्मनिर्भरता पुढच्या १० वर्षांसाठी वाढवायची आहे. जागतिक स्तरावर आर्थिक क्षेत्रात जे काही चढ-उतार होत आहेत, मंदीसारखी आव्हानं आहेतच, या सगळ्यांचा आपल्या अर्थव्यवस्थेवर कमी परिणाम व्हावा यासाठी आपण काय करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आपण काय काय करू शकतो ते ठरवा, आपण नवीन क्षेत्रांमध्ये काय करू शकतो त्याबाबत विचार करून ठेवा. कारण पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी आपण या क्षेत्रासाठी नवे निर्णय घेणार आहोत, नव्या हालचाली करणार आहोत. मोदी यांनी एकप्रकारे आरबीआयला पुढील ५-१० वर्षांसाठीच्या योजनांवर आणि धोरणांवर काम करण्यास सुचवलं आहे. शपथविधीनंतर दुसऱ्या दिवशी त्यासंबंधीचे निर्णय घेतले जातील असं आश्वासनही त्यांनी आज दिलं आहे.

## केजरीवाल यांना १४ दिवस कोठडी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या कायदेशीर अडचणी दिवसागणिक वाढताना दिसत आहेत. कथित मद्य घोटाळ्याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी (१ एप्रिल) त्यांना १५ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली. केजरीवाल यांना २१ मार्च रोजी अंमलबजावणी संचालनालयाने (एऊ) अटक केली होती. तेव्हापासून ते केंद्रीय तपास यंत्रणांच्या चौकशीच्या फेऱ्यात आहेत. ईडीने आपचे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवालांची पुढील कोठडी मागितली नसल्याने दिल्ली न्यायालयाने त्यांना पुढील १४ दिवसांसाठी तुरुंगात पाठवले. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या कथित मद्य घोटाळ्यातील सूत्रधार असल्याचा आरोप आहे. कोर्टात हजर होण्यापूर्वी त्यांनी पत्रकारांशी संवादही साधलाय. जे पंतप्रधान नरेंद्र मोदी करीत आहेत, ते देशासाठी चांगले नाही, असंही ते म्हणाले आहेत. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिल्लीच्या तिहार तुरुंगात आणण्यात आले आहे, जिथे ते पुढील दोन आठवडे राहणार आहेत. मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन आणि संजय सिंह यांसारखे 'आप'चे इतर ज्येष्ठ नेतेही याच तुरुंगात आहेत.



अरविंद केजरीवाल तिहारच्या तुरुंग क्रमांक २ मध्ये राहणार आहेत. त्यांना दुपारी उशिरा राऊस अव्हेन्यू न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले. त्यांचे सहकारी आणि माजी उपमुख्यमंत्री सिसोदिया यांना तुरुंग क्रमांक १ मध्ये ठेवण्यात आले आहे, तर राज्यसभा खासदार संजय सिंह यांना तुरुंग क्रमांक ५ मध्ये ठेवले आहे, अशी माहिती छऊत्त ने दिली आहे. दिल्लीचे माजी आरोग्य मंत्री सत्येंद्र जैन तुरुंग क्रमांक ७ मध्ये आहेत. भारत राष्ट्र समिती (इठढ) नेत्या के कविता तिहारच्या महिला विभागातील तुरुंग क्रमांक ६ मध्ये आहेत. दिल्लीत मद्य परवाने मिळवण्यासाठी कथितपणे लाच देणाऱ्या 'दक्षिण ग्रुप'चा भाग असल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. जैन वगळता आपच्या इतर सर्व नेत्यांना दिल्लीतील कथित मद्य घोटाळ्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. ईडीने आपवर लाच घेतल्याचा आरोप केला आहे.

### सुनीता यांची केजरीवालांच्या न्यायालयीन कोठडीवर प्रतिक्रिया

दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल यांनी लोकसभा निवडणुकीत पतीला तुरुंगात टाकण्याचा भाजपाचा महत्त्वाचा हेतू असल्याचा आरोप केला. ईडीचा तपास पूर्ण झाला आहे आणि न्यायालयाने त्यांना दोषी ठरवले नाही, मग त्यांनी तरीही त्यांना तुरुंगात का ठेवले? लोकसभा निवडणुकीच्या वेळी त्यांना तुरुंगात ठेवणे एवढेच त्यांचे उद्दिष्ट आहे, असे सुनीता यांनी इंडियन एक्स्प्रेसला सांगितले. तुरुंगात असतानाही केजरीवाल दिल्लीचे मुख्यमंत्री राहतील. ११ दिवस चौकशी करूनही ईडीला काहीही सापडले नाही. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली आहे. भाजपा आणि त्यांच्या ईडीचा हेतू त्यांना अटक करणे आणि दिल्लीतील आम आदमी पक्षाचा पाडाव करण्याचा आहे, असंही ज्येष्ठ आप नेत्या जस्मिन शाह म्हणाल्या. कालच आमच्या एका आमदाराशी भाजपाच्या एका सदस्याने दयालपूरमधील जाहीर सभेत संपर्क साधला आणि भाजपामध्ये सामील होण्यासाठी २५ कोटी रुपयांची ऑफर दिली होती, असाही त्यांनी आरोप केला. अरविंद केजरीवाल दिल्लीचे मुख्यमंत्री राहतील आणि तुरुंगातून सरकार चालवतील. ते मुख्यमंत्री म्हणून कर्तव्ये पार पाडू शकत नाहीत, असा कोणताही कायदा नाही, असेही शाह म्हणाल्यात. दिल्ली भाजपाचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा म्हणाले की, दिल्लीची जनता दिल्लीला लुटणाऱ्यांना बघून घेईल, अशी आशा आहे.

## महिलेवर अत्याचार करणाऱ्या पालिकेच्या दोन कर्मचाऱ्यांना अटक

**सांगली/प्रतिनिधी**

सफाईचे साहित्य आणण्यासाठी गोदामामध्ये गेलेल्या महिलेवर लैंगिक अत्याचार करणार्या महापालिकेच्या दोन सफाई कामगारांना सोमवारी अटक करण्यात आली. अत्याचारानंतर गेल्या एक महिन्यापासून हे दोघेही परागंदा झाले होते.


दोन महिन्यांपुर्वी पीडित सफाई साहित्य आणण्यासाठी गोदामात गेली असता दोघांनी एकटीला गाठून तिच्यावर अतिप्रसंग केला होता. याबाबत पीडितेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात दि. ५ मार्च रोजी तक्रार दाखल केली होती. गुन्हा दाखल झाल्यापासून महापालिकेचे कर्मचारी वैभव कांबळे व निखिल कोठावळे हे दोघेही परागंदा झाले होते. आज त्यांना स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने अटक केली.

## भुजबळांना नोटीस, सर्व दोषींना शिक्षा होणारच : दमानिया

**सोलापूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळांच्या निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. परंतु, या निर्णयाविरोधात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने छगन भुजबळ यांच्यासह या प्रकरणातील सर्व आरोपींना नोटीस बजावली आहे, असं अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे. त्यांनी यासंदर्भात आज एक्सवरून माहिती दिली.

अंजली दमानिया म्हणाल्या, आज मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मोडक यांच्यासमोर सुनावणी झाली. भुजबळांना सेशन कोर्टातून मिळालेली निर्दोष मुक्तता ही चुकीची होती, हे आम्ही कोर्टात सांगितलं आहे. कोर्टाने सर्व आरोपींना नोटीस पाठवण्याचे आदेश दिले. आम्ही कोर्टाला विनंती केली की या नोटीसा





लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आरोपींना द्याव्यात. कोर्टाने आमची मागणी मान्य केली असून २९ एप्रिलच्या आत छगन भुजबळांना एसीबी नोटीस पाठवणार आहे. दोषींना शिक्षा नक्कीच होणार ह्यात शंका नाही.

महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या महाराष्ट्र सदन कथित घोटाळा प्रकरणी ९ सप्टेंबरला छगन भुजबळ यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या(एसीबी) न्यायालयाकडे दोषमुक्त करण्यासाठी भुजबळांनी अर्ज दाखल केला होता. छगन भुजबळ यांच्यासोबत त्यांचा पुतण्या समीर भुजबळ यांनीही हा अर्ज दाखल केला होता. आपल्यावर करण्यात आलले आरोप हे निराधार आहेत. त्यामुळे न्यायालयाने आपल्याला दोषमुक्त करावे असे भुजबळ यांनी म्हटले होते. त्यानंतर न्यायालयाने भुजबळांची निर्दोष मुक्तता केली होती. यानंतर अंजली दमानिया यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका केली होती.

छगन भुजबळ हे सार्वजनिक बांधकाम मंत्री असतानाच्या काळात जारी करण्यात आलेल्या विविध कंत्राटातून भुजबळ कुटुंबीयांच्या कंपन्यांना मोठ्या प्रमाणात रोखरक्कम लाचेच्या स्वरुपाचा मिळाल्याचा आरोप होता. महाराष्ट्र सदन व इंडिया बुल्स प्रकरणात राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ११ जून २०१५ रोजी स्वतंत्र गुन्हे दाखल केल्यानंतर १५ जून २०१५ रोजी सक्तवसुली संचालनालयानेही भुजबळांविरोधात काळा पैसा प्रतिबंधक कायदान्वये दोन गुन्हे दाखल केले होते.

## भारती विद्यापीठ मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे राहत्या घरापासून अपहरण

**सोलापूर/प्रतिनिधी**

कोणीतरी अज्ञातानं अल्पवयीन मुलाचं फूसलावून अपहरण केले असल्याची खळबळजनक घटना बुधवारी, २७ मार्च रोजी रात्री घडली आहे . त्याचा सर्वत्र शोध घेऊन तो मिळून न आल्याने त्याच्या पालकांनी जेलरोड पोलीस ठाण्यात अपहरणाची फिर्याद दिली आहे . तो भारती विद्यापीठाचा विद्यार्थी असल्याचेही सांगण्यात आलंय.



याबाबत मिळालेली प्राथमिक माहिती अशी की, येथील बेगम पेठेतील रहिवासी, व्यवसायाने भाजी विक्रेते असलेले इरफान उस्मान गनी बागवान (वय ४९ वर्षे) यांचा मुलगा आयान (वय-१७ वर्षे ०९ महिने) हा विजापूर रस्त्यावरील भारती विद्यापीठात इयत्ता बारावी शिक्षण घेत आहे. बुधवारी, २७ मार्च रोजी रात्री अज्ञाताने कशाची तरी फुस लावून त्याच्या राहत्या घरापासून अपहरण केलंय. त्याचे पालक इरफान बागवान यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात याप्रकरणी फिर्याद दाखल केली आहे.

अपहृत मुलगा आयान याची उंची ०४ फुट ६, रंग सावळा, बांधा मध्यम, भाषा-हिन्दी आणि अंगावर नेसणेस पांढरा रंगाचा शर्ट आणि काळ्या रंगाची पॅन्ट असे त्याचे वर्णन आहे. याप्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३६३ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आलीय. सहाय्यक फौजदार झेड. एन. काझी या गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून अपहरणाच्या कारणाविषयी तर्कवितर्क लाभले जात आहे.

## शाहू महाराज यांच्या विरोधात आक्षेपार्ह संदेश

### सतेज पाटील यांची पोलिसांकडे तक्रार

**कोल्हापूर** : कोल्हापुरातील महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीमंत शाहू महाराज यांच्या विरोधात समाज माध्यमात आक्षेपार्ह संदेश अग्रेषित होत आहे. याबाबत कोल्हापूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष, आमदार सतेज पाटील यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. यामुळे मतदारसंघातील वातावरण तापले आहे.

कोल्हापुरात शाहू छत्रपती यांनी लोकसभा निवडणुकीसाठी प्रचार सुरू केला आहे. प्रचाराच्या पहिल्याच पातळीवर महाविकास आघाडी आणि महायुती यांच्याकडून एकमेकांच्या नेत्यावर टीका होऊ लागली आहे. या अंतर्गत महायुतीकडून समाज माध्यमात अग्रेषित होणाऱ्या संदेशमध्ये शाहू महाराज यांच्या विरोधात चुकीचा संदेश अग्रेषित केला असल्याने त्याबाबत पोलिसांत तक्रार दिली असल्याचे सतेज पाटील यांनी सोमवारी सांगितले. शाहू महाराज आणि त्यांच्या विचारसरणीला बदनाम करणारे हे संदेश आहेत. यामुळे संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, असे आमदार पाटील यांच्या पत्रात म्हटले आहे.

दरम्यान, पालकमंत्री व राष्ट्रवादीचे नेते हसन मुश्रीफ यांनी लोकसभा निवडणुकीत शाहू महाराज यांचे स्थान अबाधित ठेवायचे असल्यास वैयक्तिक टीका टाळा, असे आवाहन केले आहे. तरीही हे संदेश पसरवले जात आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




'विषय' काढला की ते मैत्री करतात!

कल्याण
900-96-448

मुंबई
123-67-377

# नाशिक प्रेसकडून सुप्रीम कोर्टाचा निर्णय पायदळी

### निवडणूक रोखे पुरवठा सुरूच, आरटीआयमधून धक्कादायक माहिती

**मुंबई/प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोख्यांसंदर्भात स्टेट बँकेला दणका देऊन सत्ताधाऱ्यांची आर्थिक नाकेबंदी केली. त्यामुळे निवडणूक रोखे प्रकरण फक्त देशात नाही जगात चर्चेत आले. पुढे हेच निवडणूक रोखे सर्वोच्च न्यायालयाने असंविधानिक असल्याचे म्हटले. पण यानंतरही नाशिकमधील इंडिया सिक्युरिटी प्रेसकडून कोट्यावधी रुपये किमतीच्या निवडणूक रोख्यांचा पुरवठा सुरूच ठेवल्याची धक्कादायक माहिती आरटीआय मधून समोर आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने १५ फेब्रुवारी २०२४ रोजी निवडणूक रोख्यांसांदर्भात निर्णय देताना निवडणूक रोखे हे असंविधानिक असल्याचे म्हटले होते. तसेच नव्याने निवडणूक रोखे जारी करण्याला स्थगिती देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. मात्र यानंतर २१ फेब्रुवारीपर्यंत नाशिकमधील सिक्युरिटी प्रेसने १ कोटी रुपये किमतीचे ८३५० निवडणूक रोखे छापून पुरवठा केल्याचे उघड झाले आहे.






या निवडणूक रोख्यांची या मिळालेल्या माहितीनुसार ८३५० निवडणूक रोख्यांवर ३ लाख ७२ हजार २२४ रुपयांचा जीएसटी लावण्यात आल्याचं दिसून येत आहे. कमांडर लोकेश बात्रा (सेवानिवृत्त) यांनी माहिती अधिकार अधिनियमान्वये माहिती मागवली होती. त्यावर दिलेल्या उत्तरात संबंधित माहिती देण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही नाशिकमधील सिक्युरिटी प्रेसमधून निवडणूक रोख्यांचा पुरवठा झाल्याने नाशिक प्रेसने न्यायालयाचा निर्णय पायदळी तुडवल्याचे दिसून येत आहे.

यासंदर्भात बँकिंग तज्ज्ञ विश्वास उटगी यांच्याशी 'महाराष्ट्र टाइम्स'ने बातचीत केली. यावेळी विश्वास उटगी म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे रद्द ठरवले आहेत. तसेच निवडणूक रोखे असंविधानिक असल्याचे म्हटले आहे. तसेच निवडणूक रोख्यांचा तपशील जारी करण्याच्या सूचना स्टेट बँकेला दिल्या होत्या. मात्र त्यानंतर सहा दिवसांनी नाशिकमधील करन्सी प्रेसने १ कोटी किमतीचे ८ हजार ३५० निवडणूक रोखे छापले आहेत. त्यामुळे नाशिकच्या प्रेसने सर्वोच्च न्यायालयाचा अवमान केला आहे. त्यामुळे न्यायालयाने नाशिक प्रेसवर कठोर कारवाई करायला हवी, असे मत उटगी यांनी व्यक्त केले. राजकीय पक्षांना देण्यात येत असलेल्या देणग्यांमध्ये स्पष्टता यावी यासाठी मोदी सरकारने एका विधेयकाद्वारे निवडणूक रोख्यांची संकल्पना मांडली. त्यानंतर मार्च २०१८ मध्ये ही योजना कार्यान्वित करण्यात आली. या योजनेतून देणगीदाराचे नाव गुप्त ठेऊन राजकीय पक्षांना मदत करण्याची सोय करण्यात आली होती. त्यानुसार भारतीय व्यक्ती, व्यक्ती समूह आणि कंपन्यांना निवडणूक रोखे खरेदी करण्याची परवानगी होती. हे निवडणूक रोखे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अधिकृत शाखांमधून खरेदी करून आपल्याला हव्या त्या राजकीय पक्षांना देता येणे शक्य झाले. त्यात खरेदीदार किंवा देणगीदाराचे नाव गुप्त ठेवण्यात येत होते. या रोख्यांची किंमत एक हजार, दहा हजार, १ लाख, १० लाख, एक कोटी इतकी होती. हे रोखे ज्या पक्षाला देण्यात येतील त्यानंतर संबंधित पक्षाने १५ दिवसात ते रोखे बँकेत वटवावे, अशी मुभा देण्यात आली होती.